## नियमित दिवाणी दावा क्र.२४/२०१५
## निशाणी क्र.२८ खालील आदेश

**श्री. नामदेव कृष्णा खैरटकर**
**विरुध्द**
**श्री. कृष्णा बाबू खैरटकर**

वादी यांनी प्रतिवादी क्र.७ म्हणून सौ. राखी पोपट खराडे यांना दाव्यात सामील करण्यात यावे व त्याप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याकरिता प्रस्तुतचा अर्ज दिला आहे. सदर अर्जाची नोटीस प्रस्तावित प्रतिवादी यांना काढण्यात आली. ते या कामी हजर झाले परंतु, त्यांनी सदर अर्जास म्हणणे दिले नाही. सबब, सदर अर्ज प्रस्तावित प्रतिवादी क्र.७ यांच्या म्हणण्याशिवाय चालविण्यात येतो.

२. दावा कलम १ मधील दावा मिळकतीपैकी अ.क्र.१ ची मिळकत प्रतिवादी क्र.५ यांनी प्रस्तावित प्रतिवादी क्र.७ यांना दि.११/०७/२०१६ रोजी खरेदी दिलेली आहे. त्यामुळे त्यांना सदर दाव्यात सामील करणे आवश्यक आहे म्हणून वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. प्रस्तावित प्रतिवादी क्र.७ हे आवश्यक पक्षकार असल्याने त्यांना प्रतिवादी क्र.७ म्हणून सामील करण्यात येते. वादी यांनी प्रस्तावित प्रतिवादी क्र.७ यांना प्रतिवादी क्र.७ म्हणून दाव्यात सामील करावे व त्या अनुषंगाने दाव्यात दुरुस्ती करुन पुढील तारखेपर्यंत दुरुस्ती प्रत दाखल करावी. सदरची दुरुस्ती मुदतीत न केल्यास सदरचा आदेश रद्द करण्यात येईल.

सही/–
(**एस. एस. पाटील**)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, महाड

महाड
दिनांक – ३०/०१/२०२४